मुख्य अभियंता (स्थापत्य) संवर्गामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एलटीएस १३२५/प्र.क्र.१६५ (भाग-१)/आ (वर्ग-१)
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १३ जून, २०२५.

संदर्भ :- शासन आदेश क्र.एसएलएस १३२३/प्र.क्र.३९४/आ (वर्ग-१), दि.११.१०.२०२४

प्रस्तावना :-

जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता संवर्गातील श्री.अरुण रामचंद्र नाईक व श्रीम. सुनंदा नरेंद्र जगताप यांना सेवाज्येष्ठतेनुसार अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संवर्गातून मुख्य अभियंता (स्थापत्य) या संवर्गामध्ये {वेतनश्रेणी S-२९ (१३११००-२१६६००)} संदर्भाधीन आदेशान्वये पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानुसार श्री.नाईक व श्रीम.जगताप यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

श्री.अरुण रामचंद्र नाईक व श्रीम. सुनंदा नरेंद्र जगताप यांची मुख्य अभियंता (स्थापत्य) संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना, सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने पदस्थापनेचे पद
१	श्री.अरुण रामचंद्र नाईक	अधीक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा	**मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर** या रिक्त पदावर.
२	श्रीम. सुनंदा नरेंद्र जगताप	अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ, पुणे	**मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, छत्रपती संभाजीनगर** या श्री.जयंत गवळी यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर

२. संदर्भाधीन दि.११.१०.२०२४ रोजीच्या आदेशामध्ये नमूद अटी या आदेशास सुध्दा तंतोतंत लागू राहतील.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील, संबंधित अधिकाऱ्यांनी पदोन्नतीने पदस्थापना केलेल्या पदावर तात्काळ रूजू व्हावे.

४. सदर आदेशामुळे पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत असलेल्या उपरोक्त पदांवर संबंधित अधिकारी रुजू झाल्यानंतर, यापूर्वी अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार आपोआप संपुष्टात येईल.

५. वरील पदोन्नत अधिकारी यांनी नवीन नियुक्तीच्या जागी ते कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

६. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्पुरती पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र. ३०३/का-१२, दि.१२.०९.२०१६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०६१३१९१५२६९३२७ असा आहे. तसेच सदर आदेश जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANIL VITTHAL DEOKATE

Digitally signed by ANIL VITTHAL DEOKATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT,
2.5.4.20=0243d4781b79f364761efde22e15161622e87986fb431d9cbc0ecc6469d5e203, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9A8B949B82C94F286DC79EF74BFCAE2A4E204E31853685E98B0B86C438C888E9, cn=ANIL VITTHAL DEOKATE
Date: 2025.06.13 19:16:15 +05'30'

(अनिल देवकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव , जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव (लाक्षेवि/ प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. सर्व कार्यकारी संचालक/महासंचालक, जलसंपदा विभाग.
६. मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मुख्य अभियंता (स्था.), जलसंपदा विभाग.
९. सर्व संबंधित अधिकारी
१०. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
११. संबधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन आ(वर्ग-१) संग्रहार्थ.